# पदभरती जाहिरात

## राष्ट्रीय आरोग्य अभियान,

## जिल्हा एकात्मिक आरोग्य व कुटूंब कल्याण सोसायटी, जिल्हा परिषद, नांदेड

राष्ट्रीय आरोग्य अभियान अंतर्गत तसेच १५ वा वित्त आयोग अंतर्गत जिल्हयात राबविण्यात येणाऱ्या विविध कार्यक्रमातील जिल्हा एकात्मिक आरोग्य व कुटूंब कल्याण सोसायटी नांदेड अंतर्गत खालील तक्त्यामध्ये दर्शविल्याप्रमाणे २९ जुन २०२४ पर्यंत करीता खाली नमुद केलेल्या अटी व शर्तीच्या अधीन राहुन कंत्राटी पध्दतीने / करार तत्वावर रिक्त असलेल्या खालील नमुद पदांची पदभरती करण्याचे आयोजित केले आहे. तरी रिक्त पदांचा तपशिल व सुचना खालील प्रमाणे आहेत.

| अ. क्र. | पदनाम | शैक्षणिक अर्हता | अनुभव | एकत्रीत मानधन प्रति महिना | रिक्त पदांचा संवर्ग | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | Consultant CPHC – 1 | Any Medical Graduate with MPH / MHA/MBA Health Care - with relevant programmatic 1 Year experience | -- | 35000/- | SC – 1<br>ST – 1<br>OBC – 2<br>**Total – 4** | मुळ कागदपत्र तपासणी दि.२८/२/२०२४ |
| | Consultant Fluorsis – 1 | | -- | | | |
| | District Quality Assurance Co.- 1 | | -- | | | |
| | Hospital Manager – 1 | | -- | | | |
| 2 | Clinical Psychologist | 1. Having a recognized qualification in clinical psychology from an institution approved and recognized, by the rehabilitation council of India, constituted under section 3 of the rehabilitation council of India act 1992.<br>**OR**<br>2. Having post graduate degree in psychology or applied psychology and a master of philosophy in clinical psychology or medical & social psychology obtain after completion of full time cause of 2 years which includes supervised clinical training from any university recognized by the university grants. Commission established under the university grants commission act 1956 & approved & recognized by the rehabilitation council of India act 1992 or such recognized qualification as may be prescribed. | 3 Years relevant Experience | 30000/- | VJ - 1 | मुळ कागदपत्र तपासणी दि.२८/२/२०२४ |
| 3 | AYUSH Medical Officer BAMS -1 | BAMS | -- | 28000/- | OBC – 1 | कौशल्य चाचणी व मुळ कागदपत्र तपासणी दि.२६/२/२०२४ |
| 4 | Pharmacist -1 | 12th Science + Diploma (D.Pharm) | | 17000/- | SC – 1 | कौशल्य चाचणी व मुळ कागदपत्र तपासणी दि.२६/२/२०२४ |
| 5 | Tutor/Teaching Staff **-1** | B.Sc. Nursing | -- | 25000/- | VJ – 1 | मुळ कागदपत्र तपासणी दि.२८/२/२०२४ |
| 6 | Block Accountant – 1 | B.Com with Tally Certification | -- | 18000/- | OBC – 1 | मुळ कागदपत्र तपासणी दि.२८/२/२०२४ |
| 7 | Dental Hygienist – 1 | 12th + Diploma in Dental Hygienist Course<br>**किंवा आरोग्यकाचा कोर्स**<br>व Registration Certificate of Maharashtra Dental Council | -- | 17000/- | VJ – 1<br>NT B – 1<br>NT D – 1<br>OBC – 3<br>EWS – 2<br>Open – 3<br>**Total - 11** | मुळ कागदपत्र तपासणी दि.२८/२/२०२४ |
| | X-Ray Technician – 1 | 12th Science + Diploma in Radiology | -- | | | कौशल्य चाचणी व मुळ कागदपत्र तपासणी दि.२६/२/२०२४ |
| | CT Scan Technician – 1 | 12th Science + Diploma ( CT Technology) | -- | | | |
| | Dialysis Technician – 6 | 12th Science + Diploma (Dialysis Technology) | -- | | | |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | Fluorosis Technician - 1 | 12th Science + Diploma (Fluorsis Tech.) | -- | | | मुळ कागदपत्र तपासणी दि.२८/२/२०२४ |
| 8 | Medical officer-25<br>(15th Finance Commission) | MBBS<br>उमेदवार न मिळाल्यास BAMS उमेदवारांना तात्पुरत्या स्वरुपात नियुक्ती देण्यात येईल. | --<br>-- | 60000/-<br>25000+ 15000 (PBI) | SC – 4<br>ST – 2<br>NT B – 1<br>NT C – 1<br>SBC - 1<br>OBC - 6<br>Open – 10<br>**Total - 25** | मुलाखत व मुळ कागदपत्र तपासणी दि.२६/२/२०२४ |
| 9 | Staff Nurse (Female)-20<br>(15th Finance Commission) | GNM/ B.Sc. Nursing | -- | 20000/- | SC – 3<br>ST – 1<br>NT C – 1<br>SBC – 1<br>OBC – 4<br>Open – 10<br>**Total – 20** | कौशल्य चाचणी व मुळ कागदपत्र तपासणी दि.२७/२/२०२४ |
| | Staff Nurse (Male) – 2<br>(15th Finance Commission) | | | | SC – 1<br>Open – 1<br>**Total - 2** | |
| 10 | MPW – 20<br>(Non Pesa)<br>(15th Finance Commission)<br>(Only for Male Candidates) | 12th Pass in Science + Paramedical Basic Training Course OR Sanitary Inspector Course | -- | 18000/- | SC – 3<br>ST – 1<br>NT C – 1<br>SBC – 1<br>OBC – 6<br>Open – 8<br>**Total – 20** | मुळ कागदपत्र तपासणी दि.२८/२/२०२४ |
| | | | | **TOTAL** | **87** | |

## अटी व शर्ती–

- सदर पदांची नियुक्ती ही निव्वळ कंत्राटी स्वरुपाची असुन २९ जुन २०२४ पर्यंतच्या कालवधी करीता असेल,
- केंद्र शासनाने अथवा राज्यशासनाने संबंधित पद नामंजुर केल्यास संबंधितास कोणतीही पुर्वसुचना न देता उमेदवारांची सेवा समाप्त करण्यात येईल.

➔ **Medical officer** या पदांकरीता अर्ज करणाऱ्या उमेदवारांची थेट मुलाखती घेण्यात येणार आहेत तसेच सर्व मुळ कागदपत्रांची तपासणी करण्यात येणार आहे. करीता सर्व संबंधितांनी दि.२६/०२/२०२४ रोजी सर्व आवश्यक मुळ कागदपत्र व त्याचा एक झेरॉक्स बंच घेऊन जिल्हा प्रशिक्षण केंद्र, मल्टी पर्पज हायस्कुलच्या मागे, वजिराबाद नांदेड येथे सकाळी ठिक ९.०० वाजता उपस्थीत राहावे. मुलाखतीसाठी जास्त उमेदवार उपलब्ध झाल्यास गुणानुक्रमे पात्र उमेदवारांना १:५ प्रमाणे बोलावण्यात येईल. अथवा त्याबाबत निर्णय घेण्याचे अधिकार निवड समितीकडे राखुन ठेवण्यात आलेले आहेत.

➔ **AYUSH Medical Officer BAMS, Pharmacist, X-Ray Technician, CT Scan Technician, Dialysis Technician** या पदाकरीता अर्ज करणाऱ्या उमेदवारांची कौशल्य चाचणी व मुळ कागदपत्रांची तपासणी करण्यात येणार असुन सर्व संबंधितानी दि.२६/०२/२०२४ रोजी जिल्हा प्रशिक्षण केंद्र, मल्टी पर्पज हायस्कुलच्या मागे, वजिराबाद नांदेड येथे सकाळी ९.०० वाजता सर्व आवश्यक मुळ कागदपत्र व एक बंच झेरॉक्स घेऊन उपस्थीत राहावे. कौशल्य चाचणी करीता जास्त उमेदवार उपलब्ध झाल्यास गुणानुक्रमे पात्र उमेदवारांना १:५ प्रमाणे बोलावण्यात येईल. अथवा त्याबाबत निर्णय घेण्याचे अधिकार निवड समितीकडे राखुन ठेवण्यात आलेले आहेत.

➔ **Staff Nurse (Male/ Female)** या पदाकरीता अर्ज करणाऱ्या उमेदवारांची कौशल्य चाचणी व मुळ कागदपत्रांची तपासणी करण्यात येणार असुन सर्व संबंधितानी दि.२७/०२/२०२४ रोजी जिल्हा प्रशिक्षण केंद्र, मल्टी पर्पज हायस्कुलच्या मागे, वजिराबाद नांदेड येथे सकाळी ९.०० वाजता सर्व आवश्यक मुळ कागदपत्र व एक बंच झेरॉक्स घेऊन उपस्थीत राहावे. कौशल्य चाचणी करीता जास्त उमेदवार उपलब्ध झाल्यास गुणानुक्रमे पात्र उमेदवारांना १:५ प्रमाणे बोलावण्यात येईल. अथवा त्याबाबत निर्णय घेण्याचे अधिकार निवड समितीकडे राखुन ठेवण्यात आलेले आहेत.

➔ **Consultant CPHC, Consultant Fluorosis, District Quality Assurance Co., Hospital Manager, Clinical Psychologist, Tutor/Teaching Staff, Block Accountant, Dental Hygenist, Fluorosis Technician व MPW** या पदाकरीता अर्ज करणाऱ्या उमेदवारांनी दि.२८/०२/२०२४ रोजी जिल्हा प्रशिक्षण केंद्र, मल्टी पर्पज हायस्कुलच्या मागे, वजिराबाद नांदेड येथे सकाळी ९.०० वाजता सर्व आवश्यक मुळ कागदपत्र व एक बंच झेरॉक्स घेऊन उपस्थीत राहावे.

➔ सर्व उमेदवारांनी नाव नोंदणी करीता सकाळी ९ ते १० वाजेपर्यंत उपस्थीत राहावे. त्यानंतर येणाऱ्या उमेदवारास प्रवेश मिळणार नाही व त्याबाबत कोणताही आक्षेप चालणार नाही. याची सर्व संबंधितांनी नोंद घ्यावी.

- **शैक्षणिक अर्हतेची गुणांकन पध्दती –**

1. पदाच्या मुळ शैक्षणिक अर्हतेच्या (Basic Qualification) च्या अंतिम वर्षाच्या मिळालेल्या एकूण गुणांच्या टक्केवारीचे ५० प्रमाणे Proportion काढण्यात येणार आहे (उदा.६० टक्के गुण असल्यास त्याचे ५० टक्के प्रमाणे Proportion=60*50/100=30)
2. पदासाठी आवश्यक शैक्षणिक अर्हतेपेक्षा संबंधित विषयामध्ये अधिकची शैक्षणिक अर्हता असल्यास अंतिम वर्षाच्या टक्केवारी २० प्रमाणे Proportion काढण्यात येणार आहे (उदा.६० टक्के गुण असल्यास त्याचे २० टक्के प्रमाणे Proportion=60*20/100=12)
3. अनुभव – गुणांकरीता अनुभव हा केवळ शासकिय, निमशासकिय, राष्ट्रीय आरोग्य अभियान अंतर्गत असल्यास ग्राहय धरण्यात येईल, संबंधित पदाशी निगडीत अनुभव असावा, प्रत्येकी एक वर्षासाठी ६ गुण जास्तीत जास्त ३० गुण देण्यात येतील

- **AYUSH Medical Officer BAMS, Pharmacist, X-Ray Technician, CT Scan Technician, Dialysis Technician, Staff Nurse (Male/ Female)** या पदाकरीता गुणांकन पध्दती व कौशल्य चाचणी घेण्यात येणार आहे. **Medical Officer (MBBS)** या पदाकरीता गुणांकन पध्दती व थेट मुलाखत घेण्यात येणार आहे. तर उर्वरीत सर्व पदांकरीता गुणांकन पध्दतीचा अवलंब करण्यात येणार आहे.
- उमेदवारांच्या कागदपत्रांची छाननी करुन पात्र उमेदवारांना गुणानुक्रमे पात्र ठरविण्यात येईल.
- पदभरती दरम्यान येणाऱ्या उमेदवारास कोणताही भत्ता देय राहणार नाही.
- अर्जदारांनी यासोबत देण्यात आलेल्या नमुन्यात लहान कुटूंबाचे प्रतिज्ञापत्र देणे आवश्यक आहे.
- अ.क्र.७ पदाकरीता प्रपत्रात दर्शविण्यात आलेल्या प्रवर्गातुन ११ पैकी पात्र व गुणानुक्रमे केवळ १० पदे भरण्यात येतील.
- सर्व पदांचे वेतन हे एकत्रित मानधनावर आहेत.
- जाहिरातीत नमुद पदांची संख्या व मानधन कमी अथवा जास्त होऊ शकते तसेच सदरची भरती रद्द करणे/स्थगीत करणे , निवड /नियुक्ती प्रक्रिया कोणत्याही टप्प्यावर कोणतेही कारण न देता बदल अथवा रद्द करणे, निवड प्रक्रिया संबंधी कोणतेही निर्णय घेण्याचे अधिकार निवड समितीकडे राखुन ठेवण्यात आलेले आहेत, निवड झालेल्या कोणत्याही उमेदवारांची नियुक्ती सेवा कालावधीत रद्द करण्याचा अथवा चालु ठेवण्याचा अंतिम अधिकार निवड समिती अध्यक्ष यांचेकडे राखुन ठेवला आहे. याबाबत कोणालाही कोणताही दावा करता येणार नाही.
- अर्जाचा नमुना सोबत जोला असुन प्रत्येक पदाकरिता उमेदवारांनी स्वतंत्र अर्ज सादर करणे अनिवार्य आहे. ज्या पदाकरिता अर्ज सादर केला आहे त्याच पदाकरिता ग्राहय धरण्यात येईल.
- शैक्षणिक पात्रता पुर्ण करीत नसलेल्या उमेदवारांना अपात्र ठरविण्यात येईल.
- आवश्यक असलेली शैक्षणिक अर्हता, पात्रता, अनुभव व आरक्षीत उमेदवारांनी जातीचे प्रमाणपत्र अर्जासोबत जोडणे आवश्यक आहे. अन्यथा त्यांना अपात्र ठरविण्यात येईल.

१. अर्जामध्ये ठळक अक्षरात स्वतःचे संपुर्ण नाव, पदाचे नाव, कायमस्वरुपी राहत असलेला पत्ता, दुरध्वनी व भ्रमणध्वनी क्रमांक, जन्मतारीख, **शैक्षणिक अर्हतेचे सर्व तपशील** – अभ्यासक्रमाचे नाव, संस्थांचे विद्यापिठाचे नाव, उत्तीर्ण झालेले वर्ष, अंतिम वर्षाच्या सर्व गुणपत्रीका, **उच्च शैक्षणिक अर्हता** – संबंधित विषयामध्येच उच्च शैक्षणिक अर्हता असल्यास गाहय धरण्यात येईल. **कामाचा अनुभव–** गुण देणे करीता अनुभव हा केवळ शासकिय, निमशासकिय, राष्ट्रीय आरोग्य अभियान अंतर्गत असल्यास ग्राहय धरण्यात येईल तसेच कामाचा अनुभव हा संबंधित विषयामध्ये असल्यास गाहय धरण्यात येईल,
काम केलेल्या संस्था/ रुग्णालयाचे नाव, ज्यापदावर काम केले आहे त्या पदाचे नाव, कालावधी, पदाची जबाबदारी व मानधन/वेतन, तसेच इतर सर्व माहिती नमुद करावी.

२. ठळक अक्षरात स्वतःचे संपुर्ण नाव, पदाचे नाव, कायमस्वरुपी राहत असलेला पत्ता, दुरध्वनी व भ्रमणध्वनी क्रमांक, जन्मतारीख, **शैक्षणिक अर्हतेचे सर्व तपशील** – अभ्यासक्रमाचे नाव, अंतिम वर्षाच्या सर्व गुणपत्रीका, **उच्च शैक्षणिक अर्हता –** संबंधित विषयामध्येच उच्च शैक्षणिक अर्हता असल्यास गाहय धरण्यात येईल. **कामाचा अनुभव–** गुण देणे करीता अनुभव हा केवळ शासकिय, निमशासकिय, राष्ट्रीय आरोग्य अभियान अंतर्गत असल्यास ग्राहय धरण्यात येईल तसेच कामाचा अनुभव हा संबंधित विषयामध्ये

असल्यास गाहय धरण्यात येईल, काम केलेल्या संस्था/ रुग्णालयाचे नाव, ज्यापदावर काम केले आहे त्या पदाचे नाव, कालावधी, पदाची जबाबदारी व मानधन/वेतन, तसेच सर्व माहिति नमुद करावी.

३. Consultant CPHP, Consultant Fluorosis, District Quality Assurance Cordinator, Clinical Psychologist, AYUSh Medical Officer, Pharmacist, Tutor/Teaching Staff, Dental Hygenist, Medical Officer, Staff Nurse या पदाकरीता अर्ज करणाऱ्या उमेदवारांनी संबंधित कौन्सिलकडे नोंदणी केलेले अद्यावत प्रमाणपत्र अथवा पावतीची सत्यप्रत अर्जासोबत जोडणे अनिवार्य आहे.

४. Provisional Registration असणाऱ्या अथवा नोंदणी प्रमाणपत्र सादर न करणाऱ्या उमेदवारास अपात्र ठरविण्यात येईल.

५. MPW पदाबाबत विज्ञान शाखेतून उच्च माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परिक्षा किंवा शासनाने तिच्याशी समतुल्य घोषित केलेली इतर कोणतीही परिक्षा उत्तीर्ण केलेली आहेत; आणि विभागाच्या आरोग्य आणि कुटुंब कल्याण प्रशिक्षण केंद्र किंवा सार्वजनिक आरोग्य संस्था, नागपूर यांच्याकडुन आरोग्य कर्मचारी पदासाठी निश्चित केलेला निमवैद्यकिय मुलभूत प्रशिक्षण अभ्यासक्रम किंवा आरोग्य व कुटूंब कल्याण मंत्रालयाने मान्यता दिलेल्या स्वच्छता निरिक्षक (सॅनिटरी इन्सपेक्टर) किंवा महाराष्ट्र शासनाने मान्यता दिलेल्या स्वच्छता निरिक्षक (सॅनिटरी इन्सपेक्टर) किंवा समक्षक अभ्यासक्रम पुर्ण करुन उत्तीर्ण असणे आवश्यक आहे. सदर सुचनांचे काटेकोर पालन करण्याबाबत सुचना आहेत.

➢ **वयोमर्यादा –**

१) जाहिरातीच्या दिवशी वैद्यकिय अधिकारी (MBBS) या पदाकरिता सेवा प्रवेशाची वयोमर्यादा ६१ वर्ष राहील.

२) अभियानांतर्गत इतर रुग्ण सेवेशी संबंधीत पदे उदा.परिचारीका, अधिपरिचारीका, तंत्रज्ञ, समुपदेशक, औषध निर्माता, इ. पदे भरतीसाठी कमाल वयोमर्यादा ५९ वर्षे राहील. स्टाफ नर्स पदाकरीता ज्या आशा स्वंयसेविकांनी जीएनएम चा कोर्स पुर्ण केलेला आहे त्यांना जीएनएम पदभरतीमध्ये वयाची अट राहणार नाही, असे जाहिरातीमध्ये नमुद करावे अशा सुचना दिलेल्या आहेत.

३) तसेच उर्वरीत सर्व पदांसाठी सेवा प्रवेशाची कमाल वयोमर्यादा खुल्या प्रवर्गासाठी ३८ व राखीव प्रवर्गासाठी ४३ अशी ठेवण्यात यावी तसेच सदर पदांकरीता राष्ट्रीय आरोग्य अभियान अंतर्गत कार्यरत कर्मचाऱ्यांना ५ वर्ष वयोमर्यादा शिथीलता राहील.

४) ६० वर्षावरील अर्जदारांकरिता जिल्हा शल्य चिकीत्सक प्रमाणित शारिरीक योग्यता (Physical Fitness) प्रमाणपत्र सादर करणे अनिवार्य आहे.

५) एमपीडब्ल्यु पदाकरीता १८ वर्षापेक्षा कमी वयाचे नाहीत आणि ३८ वर्षापेक्षा अधिक वयाचे नाहीत; परंतु राखीव प्रवर्गातील उमेदवारांच्या बाबतीत, उच्च वयोमर्यादा ४३ वर्षापर्यंत शिथील करण्यात येईल.

➢ करार पध्दतीने नेमणुका करावयाच्या असल्याने एकत्रित मानधना शिवाय अन्य कोणताही भत्ता वगैरे लागु नाही.

➢ शासकिय सेवेतुन सेवानिवृत्त/स्वेच्छा सेवानिवृत्ती कर्मचारी अर्ज करित असल्यास त्यांनी शासकिय सेवेत रुजु झाल्याच्या दिनांक, कार्यकाळ, पदनाम, सेवा निवृत्त झालेले वर्ष, सेवानिवृत्तीच्या दिनांकास मिळालेले अंतिम वेतन व सेवा निवृत्ती नंतर देय असलेले वेतन (पेन्शन) आणि यापूर्वी कंत्राटी पध्दतीने कोणत्याही कार्यक्रमात काम केले असल्यास त्याबाबतची सर्व माहिती अर्जामध्ये नमूद करावी आणि त्याच्या सत्यप्रती अर्जासोबत जोडाव्यात.

➢ सेवानिवृत्त कर्मचाऱ्याची निवड झाल्यास त्यांचे मानधन राज्यस्तरावरुन प्राप्त मार्गदर्शक सुचनेनुसार मोजमाप करुन अदा करण्यात येईल.

➢ सेवानिवृत्त कर्मचाऱ्याची निवड झाल्यास त्यांच्या सेवा काळामध्ये अथवा सेवानिवृत्तीनंतर कोणत्याही स्वरुपात चौकशी अथवा प्रकरण पंलंबित नसल्याचबाबतचे ना हरकत प्रमाणपत्र उपलब्ध करुन देण्याकरिता मा.आयुक्त, आरोग्य सेवा मुंबई यांच्याकडे प्रस्ताव पाठविण्यात येईल सदर प्रस्तावास मंजुरी प्राप्त झालयानंतरच संबंधितास नियुक्ती आदेश निर्गमीत करण्यात येतील. तसेच रुजु होण्याकरिता त्यांना जिल्हा शल्य चिकीत्सक, जिल्हा रुग्णालय, नांदेड यांचे शारीरीक व मानसिक दृष्टया सक्षम असलयाबाबतचे प्रमाणपत्र सादर करणे अनिवार्य आहे.

- निवड झालेल्या उमेदवारांने आपली सेवा कंत्राटी पध्दतीने एकत्रित मानधनावर निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात असल्याबाबत रु. १००/- च्या बॉन्ड पेपरवर विहीत नमुन्यात करारनामा देणे बंधनकारक आहे.
- निवड प्रक्रियेच्या कोणत्याही टप्प्यावर अपात्र/अयशस्वी ठरलेल्या उमेदवारांच्या बाबतीत कोणत्याही प्रकारचा पत्रव्यवहार केला जाणार नाही.
- सदर जाहिरात, भरती प्रक्रियेसंबंधी आवश्यक सुचना, पात्र/अपात्र यादी तसेच निवड यादी प्रसिध्द करणे, इ. बाबत सविस्तर तपशिल वेळोवेळी राष्ट्रीय आरोग्य अभियान कार्यालय, जिल्हा परिषद नांदेड येथे व www.zpnanded.in या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येतील.
- उमेदवारांनी कुठल्याही प्रकारचा खाजगी किंवा राजकीय दबाव आणल्यास संबंधितावर योग्य ती कार्यवाही करण्यात येईल.
- चुकीची अथवा खोटी माहिती दिल्यास संबंधिताची निवड कोणत्याही टप्प्यावर रद्द करण्यात येईल. तसेच संबंधितावर योग्य ती कार्यवाही करण्यात येईल.

स्वाक्षरीत/-
अध्यक्ष, निवड समिती तथा
मुख्य कार्यकारी अधिकारी,
जिल्हा परिषद, नांदेड.

# राष्ट्रीय आरोग्य अभियान, नांदेड

## अर्जाचा नमुना

...............................या पदाकरीता अर्ज.

पासपोर्ट आकाराचा उमेदवाराचा नजिकचा साक्षांकित करुन फोटो लावावा

प्रति,
मा. मुख्य कार्यकारी अधिकारी,
जिल्हा परिषद नांदेड

**संपूर्ण नाव** **आडनाव** **स्वतःचे नाव** **वडीलांचे/पतीचे नाव**

**मराठी** ...................... .......................... .............................

**इंग्रजी** ...................... .......................... .............................

१) पत्र व्यवहाराचा संपुर्ण पत्ता ........................................................................

.............................................................................................................

२) कायमचा पुर्ण पत्ता ...............................................................................

.............................................................................................................

३) भ्रमणध्वनी क्रमांक १. .................................... २. ......................................

ई मेल आयडी ........................................................

४) जन्म तारीखः- / / दि.२२/०६/२०२३ रोजीचे वय....... (वर्ष....... महिने......दिवस.....)

५) **अर्जदाराकडे रहिवाशी प्रमाणपत्र आहे** :- होय / नाही

६) **अर्जदाराकडे जातीचे प्रमाणपत्र आहे**:- होय / नाही  अर्ज सादर करीत असलेल्या जातीचा प्रवर्गः-..........

जात :-...........................

मुळ जातीचा प्रवर्ग :-...........................

**(नमुद करणे अनिवार्य आहे)**

७) **अर्जदार विवाहित आहे किंवा नाही (✓ टिक करावे)** :- विवाहीत / अविवाहीत

८) **शैक्षणिक अर्हता-**

| अ. क्र | उत्तीर्ण केलेली परिक्षा | **बोर्ड/विद्यापीठाचे नाव** | उत्तीर्ण वर्ष | **प्राप्त गुण** | **किती पैकी** | **टक्केवारी** |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | | | | | | |
| २ | | | | | | |
| ३ | | | | | | |
| ४ | | | | | | |
| ५ | | | | | | |

९) अनुभव :-

| अ.क्र. | धारण केलेले पद | काम केलेल्या संस्थेचे नाव व पत्ता | काम केलेल्या कालावधीची दिनांक नमुद करावी | | एकुण वर्ष | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | पासुन | पर्यंत | वर्ष | महिने | दिवस |
| १ | | | | | | | |
| २ | | | | | | | |
| ३ | | | | | | | |
| ४ | | | | | | | |

१०) आपणाविरुध्द न्यायप्रविष्ठ प्रकरण, फौजदारी, शिस्तभंगाविषयक प्रकरण वा तत्सम इत्यादी कार्यवाही चालू आहे काय ? असल्यास थोडक्यात तपशिल द्यावा.

| होय | नाही | असल्यास |
|---|---|---|
| | | |

**११) अर्जासोबत खालील (छायाकिंत) सत्यप्रती जोडल्या आहेत.**

१) ........................................ २) ..................................

३)......................................... ४) ..................................

५)......................................... ६) ....................................

७)......................................... ८) ....................................

९)......................................... १०) ....................................

**१३) अर्जदार महाराष्ट्राचा रहिवासी आहे काय? होय/नाही.**

वर नमुद केलेला तपशील खरा व बरोबर आहे. यापदासाठी विहित केलेली शैक्षणिक अर्हता मी धारण करीत आहे. याची खात्री करुनच हा अर्ज मी करीत आहे. मी असेही प्रमाणीत करतो /करते की, वर दिलेली माहिती खोटी अगर चुकीची आढळल्यास त्याकारणावरुन मी नौकरी गमावल्यास व त्याअनुषंगाने माझ्या विरुध्द होणाऱ्या सर्व कायदेशीर कार्यवाहीस मी पात्र व बांधील राहील व त्याबाबत माझी कोणतीही तक्रार राहणार नाही. तसेच जाहिरातीत नमुद केलेल्या सर्व अटी व शर्ती मी वाचल्या असुन त्या मला मान्य आहेत.

ठिकाण:-
दिनांक:-

स्वाक्षरी...............................

नाव ..................................

........................................

# प्रतिज्ञापत्र

## नमुना अ

मी.श्री./श्रीमती/कुमारी ..............................................................

श्री............................................................... यांचा/यांची मुलगा/मुलगी/पत्नी वय......... वर्ष, राहणार.................................................. ........................................................ याद्वारे असे जाहीर करतो/करते की,

१) मी.................................................. या पदासाठी माझा अर्ज दाखल केलेला आहे.

२) आज रोजी मला ................. (संख्या) इतकी हयात मुले आहेत, त्यापैकी दिनांक २३ जुलै २०२० यानंतर जन्माला आलेल्या मुलांची संख्या.............. आहे.

(असल्यास जन्मदिनांक नमूद करावा)

३) दिनांक २३ जुलै , २०२० रोजी हयात असलेल्या मुलांची संख्या दोनपेक्षा अधिक असेल तर दिनांक २३ जुलै २०२० व तद्नंतर जन्माला आलेल्या मुलांमुळे या पदासाठी मी अनर्ह ठरविण्यास पात्र होईल याची मला जाणीव आहे.

ठिकाण :-

दिनांकः-

उमेदवाराची सही-

नाव ..................................